# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर
## P.R.O Office, Palghar
Phone No. 02525-297032, Mob No.8669604078
Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)
E-mail : propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.६८५ दि.३१/०८/२०२०

## पालघर पोलीस ठाणे यांनी गांजा विक्री करणा-या इसमांना केले गजाआड

दि.३०/०८/२०२० रोजी पालघर पोलीस ठाणे यांना मिळालेल्या गोपनीय माहीतीनुसार एक इसम नंडोरे नाका पालघर पुर्व ता.जि.पालघर येथे गांजा विक्री करीता घेवून जाणार आहे, अशी गुप्त माहीती मिळाली होती. मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे उपविभागिय पोलीस अधिकारी, पालघर श्री. विकास नाईक, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.डी.एस.पाटील व पालघर पोलीसांचे पथक यांनी सापळा रचुन आरोपी १) रोशन आशिफ अली, वय-२६ वर्षे, धंदा-चालक, रा.नेहरु साई सेन्टर जवळ जिजामाता मुंबई, २)अफजल नजिमुल्ला शेख,वय-२८ वर्षे, रा.टेननाका मनोर ता.जि.पालघर, यास एक तिन चाकी अल्फा महिंद्रा प्लस कंपनीची गाडी क्र. एम.एच.४८ टी १६०४ वरुन गांजा वाहतुक करीत असताना रंगेहात पकडून त्यांचे ताब्यातून १ किलो ७०० ग्रॅम वजनाचा एकूण अंदाजे १७,०००/- रुपये किंमतीचा मेहंदी रंगाचा उग्र दर्प असलेला गांजा हा अमली पदार्थ बेकायदेशीर रित्या विक्री करण्याकरीता स्वत: जवळ बाळगला असताना मिळुन आले तसेच १३३०/- रुपये रोख रक्कम व एक २०,०००/- रु. किंमतीची तिन चाकी अल्फा महिंद्रा प्लस कंपनीची गाडीसहीत एकुण ३८,५३०/- रुपये किंमतीच्या मुद्देमाल जप्त करुन आरोपी विरुध्द पालघर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. II २३३/२०२० एन.डी.पी.एस.ॲक्ट. १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) व भा.द.वि.सं. कलम ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन पुढील तपास पालघर पोलीस ठाणे येथे सुरु आहे. सदर आरोपीत यांना दिनांक ३०/०८/२०२० रोजी २०.५४ वा. अटक करण्यात आले आहे.

सदरची कारवाई उपविभागिय पोलीस अधिकारी, पालघर श्री.विकास नाईक, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.डी.एस.पाटील, प्रभारी अधिकारी पालघर पोलीस ठाणे व पालघर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner